MHRG040040472022

**दिवाणी चौकशी अर्ज नं.१६४७/२०२२**

**श्री. धनंजय सुंदर शेट्टी व इतर ... अर्जदार**

**विरुध्द**

**कोणीही नाही**

## निशाणी क्रमांक ०१ वरील आदेश

०१. सदरचा अर्ज मुंबई रेग्युलेशन VIII १८२७ अन्वये वारस दाखला मिळणेकरिता दाखल केला आहे.

०२. अर्जातील कथन असे आहे की, सुनिता धनंजय शेट्टी हया दिनांक १२/०६/२०१० रोजी मयत झाल्या आहेत. मयत सुनिता धनंजय शेट्टी यांचे अर्जदार क्र.१ हे पती, अर्जदार क्र.२ हा मुलगा व अर्जदार क्र.३ ही मुलगी आहे.

०३. अर्जदार यांचे व्यतिरिक्त मयत सुनिता धनंजय शेट्टी यांना इतर कोणीही वारस नाहीत. अर्जदार यांनी अन्य कोणत्याही कोर्टात अशा स्वरुपाचा वारस दाखला मिळण्याकरिता अर्ज दाखल केलेला नाही.

०४. तसेच जाहीरनामा (नि.७) दिनांक १२/१२/२०२२ रोजी व दैनिक 'रायगड नगरी' मध्ये दिनांक २३/११/२०२२ रोजी (नि.१४) रोजी जाहीर नोटीस दिल्यानंतर ३० दिवसांत कोणीही सदरच्या अर्जास हरकत घेतलेली नाही.

०५. वरील कथनास पुष्टी देण्याकरिता अर्जदार नं.१ धनंजय सुंदर शेट्टी यांनी त्यांचे पुराव्याचे शपथपत्र (नि.१२), मयत सुनिता धनंजय शेट्टी यांच्या मृत्यू दाखल्याची पडताळलेली प्रत (नि.१८), अर्जदार यांचे आधारकार्डची पडताळलेली

प्रत (नि.१७), कुळमुखत्यारपत्राच्या पडताळलेल्या प्रती (नि.१५ व १६), कराराची पडताळलेली प्रती (नि.१९, २१ व २३), शेअर्स सर्टीफिकेटची पडताळलेली प्रती (नि.२०, २२, २६), ताबा पत्राची पडताळलेली प्रत (नि.२४), सिडकोने दिलेल्या पत्राची पडताळलेली प्रत (नि.२५) व मुल्यांकनाबाबत पुरशीस (नि.१३) हे दस्तऐवज दाखल केले आहेत.

०६. अभिलेखावरील सर्व दाखल दस्तऐवजांचे तसेच वरील सर्व बाबींचे विवेचन केल्यानंतर असे स्पष्ट होते की, अर्जदार हे मयत **सुनिता धनंजय शेट्टी** यांचे कायदेशीर वारस असून सदर अर्जाला कोणीही हरकत घेतलेली नाही. म्हणून अर्ज मंजूर करुन मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## :: आदेश ::

०१ अर्ज मंजूर करण्यात येतो.

०२ **अर्जदार नं.१**–धनंजय सुंदर शेट्टी, **अर्जदार नं.२**–चंदन धनंजय शेट्टी व **अर्जदार नं.३**–खुशबू धनंजय शेट्टी हे मयत **सुनिता धनंजय शेट्टी** यांचे कायदेशीर वारस असून त्यांचे नावे वारस दाखला देण्यात यावा.

०३ अर्जदार यांनी आवश्यक ते न्यायालयीन मुद्रांक शुल्क भरावे.

AVANI ASHWIN GODSE
Digitally signed by AVANI ASHWIN GODSE
Date: 2023.02.14 13:48:11 +0530

पनवेल

दिनांक : १३/०२/२०२३ (अ.अ. गोडसे )

२रे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, पनवेल.